# साधने

## कौटिल्याचे अर्थशास्त्र

मौर्यांचा इतिहास जाणून घेण्यासाठी कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथाचा फार उपयोग होतो. अर्थ हा राज्याचा पाय असल्याने राज्यशास्त्रावरील या ग्रंथाला अर्थशास्त्र हे नाव देण्यात आले आहे. ६००० श्लोकांचा हा ग्रंथ १५ विभाग व १८० उपविभागांमध्ये विभाजित असून इ.स. १९०९ मध्ये डॉ. शामाशास्त्री यांनी या ग्रंथाचा शोध लावला व त्याचे सुंदर भाषांतर केले. या ग्रंथाची रचना प्रशासनाच्या प्रयोजनाच्या दृष्टीने करण्यात आली असून यात प्रशासनाशी निगडित समस्यांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. युद्ध व शांततेच्या काळात राज्याच्या विविध संस्थांची भूमिका व कर्तव्ये कोणती असावीत याची माहिती या ग्रंथात देण्यात आली आहे. ग्रंथात राजनीतीवर भाष्य करणाऱ्या प्राचीन लेखकांचाही उल्लेख असून यात निरंकुश राज्याचे विस्तृत विवेचन आहे. त्या तुलनेत प्रजासत्ताकांचे वर्णन संक्षिप्त आहे. राजाची प्रजेप्रती कर्तव्ये, अमात्याची पात्रता व त्याची कर्तव्ये, मंत्रिपरिषदेचे कार्य, नागरी सेवा, करव्यवस्था इ. चे या ग्रंथात सविस्तर विवेचन असल्याने तो प्राचीन भारतीय इतिहासावरील अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे. कौटिल्याला भारताचा मॅकॅव्हली म्हणतात. ज्याप्रमाणे इ.स. १५१३ मध्ये 'The Prince' हा ग्रंथ लिहून पंडित मॅकॅव्हलीने राजसत्तेच्या सिद्धांताचा पुरस्कार करून जगभर नावलौकिक मिळविला त्याचप्रमाणे कौटिल्याने अर्थशास्त्राची रचना करून प्राचीन भारताच्या इतिहासात स्वतःचे नाव अजरामर करून ठेवले

**कौटिल्याचा पूर्वेतिहास** –

कौटिल्य ऊर्फ चाणक्य या जणू एकाच नाण्याच्या बाजू आहेत. चाणक्याशिवाय मौर्यांच्या इतिहासाची कल्पनाच संभवत नाही. विष्णुगुप्त शर्मा तक्षशिलेच्या एका ब्राह्मणाचा मुलगा चणय गावाचा राहणारा म्हणून चाणक्य व विद्वान असल्याने आर्यचाणक्य या नावाने ओळखला जाई. निरनिराळ्या ग्रंथांत त्याचा विष्णुगुप्त, चाणक्य, पक्षिणस्वामी, द्रामिल, अंगुल, मल्लनाग, कौटिल्य इ. निरनिराळ्या नावांनी उल्लेख येतो. त्यापैकी विष्णुगुप्त, चाणक्य आणि कौटिल्य या नावाचा वारंवार उल्लेख येतो. काही इतिहासकार या तिन्ही व्यक्ती भिन्न आहेत असे मानतात परंतु निरनिराळ्या पुराव्यांचा आढावा घेतल्यानंतर ही तिन्ही नावे एक व्यक्तीची आहेत हे सिद्ध होते.

चाणक्य ऊर्फ कौटिल्याने अर्थ हा राजकारणाचा पाया असल्याने या ग्रंथाल अर्थशास्त्र हे नाव दिले. या प्रथात राजकीय समस्यांचे जितके समर्पक विवेचन करण्यात आले आहे तितके इतर कोणत्याही प्राचीन किंवा अर्वाचीन भारतीय ग्रंथात नाही. त्यामुळे आजही हा ग्रंथ राज्यकर्त्यांना मार्गदर्शक म्हणून उपयोगी ठरतो. यातील निरनिराळ्या विषयांचे संक्षिप्त विवरण पुढीलप्रमाणे आहे.

**राज्याचे स्वरूप-** कौटिल्य 'राज्य' ही सर्वश्रेष्ठ, सर्वतोपयोगी आणि अत्यावश्यक संस्था मानतो. या संस्थेअभावी 'मात्स्यन्याय' किंवा 'बळी तो कान पिळी' या न्यायाप्रमाणे सबल दुर्बलांचे शोषण करतात. या संस्थेमुळे राजा दुबळया प्रजेला संरक्षण देऊन तिचे कल्याण साधतो म्हणून ही संस्था अनिवार्य आहे. राज्याचा सप्तांग सिद्धांत राज्याच्या सुरक्षिततेसाठी कौटिल्य १) स्वामी २) - अमात्य ३) जनपद ४) दुर्ग ५) कोष ६) दंड आणि ७) मित्र ही सात अंगे सांगता ही सातही अंगे परस्परांना पूरक असून त्यामुळेच राज्य सुरक्षित राहते.

**१) स्वामी किंवा राजा**

राजा हा राज्याचे सर्वात मुख्य अंग असून तो उच्चकुलोत्पन्न, धार्मिक, बुद्धिवादी, साहसी, पराक्रमी, उत्साही, विनयशील, निर्भीड, कृतज्ञ, न्यायी थोडक्यात सर्वगुणसंपन्न असावा. तो कोणत्याही मोहाच्या आहारी जाणारा व जितेंद्रिय असावा. आणीबाणीच्या प्रसंगीही विचलित न होता स्थिरबुद्धीरे निर्णय घेणारा असावा. त्याच्या अंगी आदर्शवाद आणि व्यवहारवादाचे उत्तम मिश्र असावे.

**२) अमात्य** –

राज्याचे अधिकारी कौटिल्याच्या मते राजाने राज्याचा सर्व कारभार अमात्यांच्या सल्ल्याने व साहाय्याने करावा. अमात्य हे बुद्धिवान, नीतिवान, विवेकी, धाडसी, निःस्पृह आणि निष्ठावान असावे. करवसुली, राजपरिवाराचे रक्षण, किल्ले व राज्याचे संरक्षण इ. अमात्यांची कामे होत.

**३) जनपद** –

कौटिल्याने 'जनपट' हा शब्द राष्ट्र किंवा राज्य यांना उद्देशून वापरला आहे. जनपदाच्या सीमा या नैसर्गिक म्हणजे नद्या, पर्वत यांनी निर्धारित असाव्यात. जनपदाच्या सीमेवर आणि मध्यभागी कितने असावेत. जनपदाची आतील जमीन अत्यंत सुपीक हवी. जनपदाच्या आतील भागात घनदाट जंगले, दलदल, खडकाळ प्रदेश वह प्राणी नसावेत. जनपद हे विपुल शुद्ध जलयुक्त, प्रदूषणमुक्त आणि निसर्गरम्

असावे. जनपदात सुलभ आणि सोयीस्कर असे जल व स्थल मार्ग असावेत जनपदाची प्रजा पवित्र आचरणयुक्त, राजनिष्ठ आणि राजाला नियमित कर देण्याइतपत समूट असावी.

**४) दुर्ग**

दुर्ग किंवा किल्ले शत्रूपासून राज्याचे रक्षण करणारे उत्कृष्ट साधनप्राचीन भारताचा इतिहास असल्याने ते राज्याच्या सीमेवर असावेत हे किल्ले चार प्रकारचे हवेत. अ) औदिक दुर्ग ज्याच्या चारही बाजूंनी पाणी आहे. (पाणकिल्ले किंवा जलदुर्ग) ब) पार्वत दुर्ग डोंगरी किल्ले, (क) धान्वन दुर्ग मरूद्यानातील किल्ले. यांच्या सभोवती पाणी व हिरवळ असते

ड) वनदुर्ग - याच्या चारही बाजूंना घनदाट अरण्य व दलदल असावी औदिक आणि पार्वत दुर्ग राज्याचे शत्रुपासून रक्षण करतात तर धान्वन आणि वनदुर्ग राजाला संकटकाळी आश्रय आणि संरक्षण देतात. या सर्व किल्ल्यात पाणी, धान्य, शस्त्रास्त्रे आणि सैनिक यांचा भरपूर साठा असावा.

**५) कोष (संपत्ती)**

हा राज्याचा मुख्य आधार हो.य राजाने त्याला वारसाहक्काने मिळालेल्या कोषात भर घालायला हवी. कोषात धान्य, सुवर्ण, रत्ने, रजत पर्याप्त हवे. परंतु हा संग्रह धर्ममान्य मार्गानीच करायला हवा. कर, नजराणे, खंडणी, शत्रूप्रदेशात लूट इ. मार्गानी कोषात सतत भर पडायला हवी. संपत्तीचा विनियोग प्रजेचे कल्याण आणि राज्याच्या हितासाठीच केला जावा.

**६) दंड –**

कौटिल्याने दंड हा शब्द सैन्य या अर्थाने वापरला आहे. अंतर्गत सुव्यवस्था आणि बहिर्गत आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी कौटिल्य दंड किंवा सैन्याची आवश्यकता प्रतिपादन करतो सैन्य पायदळ, घोडदळ, रथदळ आणि हत्तीदळ असे चतुरंग असावे. कौटिल्याने सैन्याचे सात प्रकार सांगितले आहेत..

अ) मोलसेना- राजधानीच्या सुरक्षिततेसाठी तैनात करण्यात आलेले सैन्य

ब) भूतसेना- पैसे देऊन लढण्यासाठी भरती केलेले सैन्य

क) श्रेणी सैन्य- लढाऊ जमातीचा भरणा असलेले सैन्य

ड) मित्रसेना- मित्रराज्यांची सेना.

इ) अमित्र सेना-शत्रुराजाची सेना

प) अटवी सेना- लढाऊ जमातीशिवाय इतर जमातीचे सैन्य

फ) औत्साहिक सेना - युद्धप्रसंगी लुटालूट करणाऱ्यांची सेना..

सैनिक हे शौर्य व पराक्रमाची परंपरा असलेले, धाडसी, जय-पराजयाची पर्वा न करता प्राणपणाने लढणारे व राजाप्रती अढळ निष्ठा बाळगणारे असावे. युद्धप्रसंगी सैनिकांना राज्याकडून उत्तम दर्जाची शस्त्रे पुरविली जावीत. त्यांना नियमित व पुरेसा पगार मिळावा. सैनिकांच्या माघारी त्याच्या कुटुंबीयांची योग्य ती निगा राखली जावी त्यामुळे सैनिकाला त्याच्यामागे त्याच्या कुटुंबाची न उरता तो स्वतः चे सर्वस्व पणाला लावून लढण्यास प्रवृत्त होईल.

**७) मित्र**

कौटिल्याने राज्याच्या हितरक्षणासाठी मित्राची महती वर्णन केली आहे. राज्याच्या प्रगतीसाठी आणि संकटकाळी मित्र साहाय्यभूत ठरतो. मित्र हा दीर स्थिर बुद्धीचा, कोणत्याही मोहाला बळी न पडणारा, सदैव राजाचे हित चितारा आणि राजाच्या प्रत्येक कार्यात सहकार्यांची भावना बाळगणारा असावा. तो शूद्र, सोभी, भित्रा व संकुचित वृत्तीचा नसावा.

**राजाचे कर्तव्य**

कौटिल्याने राजाची कर्तव्ये पुढीलप्रमाणे सांगितली आहेत. –

**१) सुरक्षितता -**

अंतर्गत वडाळ्या आणि परकीय आक्रमणांपासून प्रजेचे संरक्षण करणे हे राजाचे आद्य कर्तव्य आहे.

**२) शांतता आणि सुव्यवस्था**

राज्यात शांतता व सुव्यवस्था राखणे, ती भंग होऊ नये म्हणून भंग करणाऱ्यांचा व तसा प्रयत्न करणाऱ्यांचा छडा लावणे व त्यांना कठोर शासन करणे.

**३) कृषि**

कृषि हा जीवनाधार असल्याने ती सुजलाम सुफलाम व्हावी म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करणे. शेतकरी सुखी तर राजा सुखी म्हणून शेतीत भरपूर धनधान्य पिकण्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय करणे.

**४) पशुरक्षण व संवर्धन**

पशु हे राज्याचे धन असल्याने त्याचे रक्षण व संवर्धन व्हायला हवे त्यासाठी कुरणे तयार करणे, पशूचा रोगांपासून बचाव करणे इ उपाययोजना व्हाव्यात

**५) व्यापार**

व्यापारामुळे राज्याला समृद्धी येते. व्यापार देशांतर्गत व आंतरदेशीय हवा प्रजेला योग्य दरात योग्य माप-वजनाच्या व दर्जेदार वस्तू नियमित उपलब्ध वस्तूंच्या विक्रीमूल्यानुसार करआकारणी यावी धान्य, औषधी आणि जीवनावश्यक वस्तूंवर कर आकारण्यात येऊ नयेत. व्यापाराचे नियम असावेत व त्यांचे उल्लंघन करणाऱ्यांना कडक शासन व्हावे.

**६) निसर्ग प्रकोपापासून रक्षण**

निसर्गाच्या प्रकोपापासून प्रजेने रक्षण - करणे हे राजाचे कर्तव्य आहे. कौटिल्याच्या मते हा प्रकोप आठ प्रकारचा असतो आग, महापूर, रोगराई, दुष्काळ, उंदिर, हिंस्र प्राणी, साप आणि राक्षस (अनार्य किया वन्य जमात असावी) यांच्यापासून प्रजेचे रक्षण करण्यासाठी राजाने अधिकारी नेमावेत व प्रजेला आवश्यक ती सर्व मदत करावी.

**७) राज्यविस्तार**

सैन्य नेहमी कोणत्या ना कोणत्या कामात व्यस्त असावे. ते रिकामे असल्यास एकतर बंडासाठी प्रवृत होते किंवा त्यात शैथिल्य येते. सैन्याला व्यस्त ठेवण्यासाठी राज्यविस्तार हा उत्तम उपाय आहे. राज्याच्या विस्तारामुळे राज्याच्या समृद्धीत तर भर पडतेच शिवाय सैन्यही कार्यक्षम राहते.

**८) सामाजिक व सांस्कृतिक कार्य** कौटिल्य हा वर्णाश्रम व्यवस्थेना पुरस्कर्ता होता. निरनिराळे वर्ग व त्या वर्णातील निरनिराळे घटक आपापल्या कर्तव्यांचे प्रामाणिकपणे पालन करतात किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी राजाची आहे असे कौटिल्य म्हणतो. अनाथ, अपंग, वृद्ध, विधवा यांच्या पालनपोषणाची जबाबदारी राजाने उचलावी. सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांची जोपासना व्हावी म्हणून राजाने विशेष जागरूक राहायला हवे. प्रजेत शिक्षणाचा प्रसार व्हावा लोकमनोरंजनासाठी कौटिल्य गायक,वादक, नर्तक, गणिका, वेश्या यांची आवश्यकता प्रतिपादन करतो व त्यांच्यासाठी नियमही सांगतो.

**९) जनतेची सुरक्षितता**

जनता व अधिकारी यांच्या सुरक्षिततेवर कौटिल्य विशेष भर देतो. राजाने प्रजेचे राज्य कर्मचारी, व्यापारी, चोर, दरोडेखोर यांच्यापासून रक्षण करावे. प्रजेला पीडा देणाऱ्या सर्व समाजकंटकांना कठोर शासन करावे. कौटिल्य अगदी बारीक गोष्टींचे विवरण देतो. त्यावरून त्याला कल्याणकारी, आदर्श राज्याची कल्पना अभिप्रेत होती हे दिसून येते.

**राजा आणि राजपद**

**१) राजपदाची आवश्यकता -**

कौटिल्य वर्णाश्रमव्यवस्थेचा कट्टर पुरस्कर्ता होता. त्यामुळे प्रत्येकाने आपापल्या वर्णातर्गत कर्तव्यांचे पालन करणे आवश्यक आहे. प्रजेने तिच्या कर्तव्यांचे पालन करावे म्हणून तिच्यावर अंकुश हवा. वर्णाश्रमव्यवस्था टिकावी म्हणून शक्तिशाली संस्था आवश्यक आहे. राजपद ही जशी एकमेव संस्था आहे की जी ही व्यवस्था टिकवू शकते तसेच सबलांकडून दुर्बलांचे शोषण होऊ नये व धर्मानुसार राज्य कारभार चालावा म्हणून राजपद आवश्यक आहे.

**२) राजाचे महत्त्व –**

कौटिल्याच्या मते राज्याचे यशापयश राजाच्या सामर्थ्यावर अवलंबून असते. कौटिल्य राजतंत्रात्मक शासनप्रणालीचा पुरस्कार करतो. राजाचे सर्वोच्च आणि अंतिम अधिकार राजाच्या हाती केंद्रित व्हायला हवे. कौटिल्याचा राजा हा केवळ आदर्शवादी नसून तो व्यवहावादीही आहे. कौटिल्याला पाश्चात्त्यांचा 'राजाच्या दैवी अधिकाराचा सिद्धांत' मान्य नाही. तो म्हणतो निरपराध व्यक्तीला दंड देणारा राजा स्वतः दंडनीय आहे. राजा हा दुबळा व अकार्यक्षम असेल तर त्याला पदच्युत करून सबल आणि सक्षम व्यक्तीला सिहासनावर बसविण्याचा अधिकार कौटिल्य प्रजेला देतो.

**३) राजाचे गुण -** आदर्श राजाचे गुण कौटिल्य पुढीलप्रमाणे वर्णितो.

**अ) आकर्षक व्यक्तिमत्व -** राजाचे व्यक्तिमत्त्व असे हवे की प्रजा त्याच्याकडे चटकन आकर्षित व्हावी. राजा हा प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा, बलशाली, दृढनिश्चयी, शास्त्रार्थ जाणणारा ज्ञानी व वृद्ध यांचा आदर करणारा, लोककल्याणाची तळमळ असणारा, मृदुभाषी, मितभाषी व सत्यवचनी असावा.

**ब) मेधावी -** राजा हा मेधावी म्हणजे तीक्ष्ण बुद्धिमत्तेचा असावा सारासार विचार करून जलद व योग्य निर्णय घेण्याची त्याच्यात क्षमता असावी. निरनिराळ्या प्रश्नाचे आकलन व ते सोडविण्याची त्याची पात्रता असावी. क) चैतन्यमयी - राजा हा अत्यंत उत्साही असावा. त्याच्या प्रत्येक कृतीतून चैतन्याचा झरा वाहत असावा. तो स्वतःच्या उत्साहपूर्ण वागण्याने प्रजेत चैतन्य आणि उत्साह निर्माण करू शकतो.

**ड) इतर गुण -** काही गुण जन्मजात असतात तर शिक्षणाद्वारे राजपदाला आवश्यक काही गुण आत्मसात करता येतात म्हणूनच तो राजाच्या शिक्षणावर अतिशय भर देतो त्याच्यामते व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होणारे शिक्षण राजाला देण्यात यावे. शास्त्र आणि शस्त्र यांच्या शिक्षणाबरोबरच बुद्धी, चारित्र्य सद्गुणांचाही विकास होईल असे शिक्षण हवे

**राजाची दिनचर्या**

राजाच्या हाती सर्वोच्च सत्ता केंद्रित झाल्याने तो जुलमी होण्याची दाट शक्यता असते. ही शक्यता टाळण्यासाठी राजाची दिनचर्या कशी असावी ते कौटिल्य सांगतो. राजाच्या वैयक्तिक सुखसोयी आणि प्रशासकीय कामाची यशस्विता लक्षात घेऊन कौटिल्याने राजाच्या दिवस व रात्रीला आठ-आठ भागांत विभाजित केले व त्याच्या भागातील राजाच्या दैनंदिन कामकाजाचे व कर्तव्याचे स्वरूप निश्चित केले.कौटिल्याच्या मते राजाने दिवसाच्या पहिल्या भागात प्रजेचे संरक्षण, राज्याचे उत्पन्न व खर्च यावर चर्चा व उपाययोजना, दुसऱ्या भागात नागरिकांच्या गाठीभेटी व त्यांच्या तक्रारींचे निवारण तिसऱ्या भागात स्नान, भोजन, स्वाध्याय, चौथ्या भागात कर विभागाचे निरीक्षण, पाचव्या भागात मंत्र्यांशी चर्चा, सल्लामसलत व गुप्तचरांशी भेट, सहाव्या भागात इच्छेनुसार विहार, सातव्या भागात हत्ती, घोडे, रथ, शस्त्रे यांचे निरीक्षण आणि आठव्या भागात सेनापतीशी संरक्षण, युद्धविषयक चर्चा व सायंकाळी ईश्वरोपासना रात्रीच्या पहिल्या भागात गुप्तहेरांच्या भेटी दुसऱ्या भागात स्नान, भोजन, तिसऱ्या भागात संगीत, नृत्याचा आस्वाद व अंत पुरात प्रवेश, चौथ्या आणि पाचव्या भागात निद्रा (तीन तास) सहाव्या भागात झोपेतून उठल्यावर दिवसभर करावयाच्या कामाचे चितन, सातव्या भागात गुप्तहेरांच्या भेटी आणि आठव्या भागात पुरोहित, आचार्य, विद्वान यांचा सहवास, चर्चा आणि विचारविनिमय या अत्यंत व्य दिनचर्येवरून राजाचे जीवन एखाद्या तपस्व्यासारखे दिसते. राजपद ही गुलाब पुष्पाची मुलायम आणि सुगंधित शेज नसून ती काटेरी गादी आहे हे यावरून स्पष्ट होईल.

कौटिल्याने अर्थशास्त्र ग्रंथात आदर्श राजाचे चित्र रेखाटले आहे. चंद्रगुप्ताने कौटिल्याच्या अर्थशास्त्रानुसार राज्यकारभार करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला असावा.

## Indica (इंडिका)

मेगस्थनीज हा बॅक्ट्रियाचा ग्रीक राजा सेल्युकस निकेटरचा चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारातील वकील किंवा राजदूत. सेल्युकसचा पराभव झाल्यानंतर सेल्युकस आणि चंद्रगुप्तच्या दरम्यान जो तह झाला त्यानुसार सेल्युकसने मेगस्थनीजला पाटलीपुत्र येथे चंद्रगुप्तच्या दरबारात वकील म्हणून नियुक्त केले. इ.स.पू. ३०४ ते इ.स.पू. २९९ या कालखंडात मेगस्थनीज भारतात होता. भारतातील या वास्तव्यात त्याने जे अवलोकन केले त्याचा वृत्तांत त्याने 'इंडिका' या ग्रंथात दिला आहे. आज हा ग्रंथ मूळ स्वरूपात उपलब्ध नाही परंतु या ग्रंथातील विवरणे काही ग्रीक इतिहासकारांनी त्यांच्या ग्रंथात दिली आहेत. त्यावरून आपल्याला इंडिकातील लिखाणाची व त्या लिखाणावरून मौर्यकालीन भारताच्या इतिहासाची माहिती मिळते

इंडिका हा ग्रंथ मौर्याच्या इतिहासाचे विश्वसनीय साधन समजला जात असला तरी अनेक इतिहासकारांना इंडिकाच्या विश्वसनीयतेविषयीच शंका आहे. स्टॅबो हा मेगस्थनीज व त्याच्या इंडिका ग्रंथाचा कट्टर टीकाकार लिहितो, "ज्या इतिहासकारांनी भारताविषयी लिहून ठेवले आहे ते एकजात खोटारडे आहेत त्यात डिमॅकसचा क्रम पहिला व मेगस्थनीजचा दुसरा आहे. " इंडिकाच्या विश्वसनीयतेवर आरोप करताना टीकाकार पुढील आक्षेप घेतात.

१) मेगस्थनीज हा ग्रीक असल्याने तो भारतीय भाषा, परंपरा, सामाजिक संदर्भ याविषयी अनभिज्ञ होता. या सर्वांचे त्याला यथार्थ आकलन होणे केवळ अशक्य होते

२) वर्णाश्रमव्यवस्थेमागील भूमिका त्याला समजू शकली नाही. याचा अर्थ त्याने श्रमविभाजन असा केला आहे.

३) त्याची अनेक विधाने केवळ ऐकीव माहितीवर आधारित असल्याने ती विसंगतीपूर्ण आहेत.

४) भारताच्या विशेषतः दक्षिण भारताच्या भौगोलिक अज्ञानामुळे त्यांच्या भौगोलिक वर्णनात घोडचुका आहेत.
५) भारताचे वर्णन करताना त्याने इराण व ग्रीक परपरा आणि भारतीय परंपरा यांचा अनेक ठिकाणी गोंधळ केला आहे.
६) भारताविषयी लिहिताना त्याची काही विधाने अत्यंत निष्काळजीपणाने केलेली आढळतात. त्यामुळेच भारतीयांना लेखनकला अवगत नव्हती, भारतात कपाळाच्या मध्यभागी एकच डोळा असणारे, नाकपुड्या नसणारे लोक राहतात असे अत्यंत हास्यास्पद व बेजबाबदार विधान तो करतो.

या कारणांमुळेच स्टॅबो मेगस्थनीजला खोटारडा म्हणतो. मेगस्थनीजच्या वर्णनात अनेक दोष असूनही भारताचा इतिहास जाणून घेण्याच्या दृष्टीने इंडिकाचे महत्त्व नाकारता येत नाही. कारण मेगॅस्थनीज बरीच वर्षे भारतात राहिला. अनेक घटनांचा तो प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होता. त्यामुळे स्टॅबोप्रमाणे त्याला एकदम खोटारडा न ठरविता डॉ. स्मिथ म्हणतात त्याप्रमाणे त्याने जे लिहून ठेवले आहे ते स्वीकारताना काळजीपूर्वक स्वीकारले पाहिजे. इंडिका हा ग्रंथ मूळ स्वरूपात आज उपलब्ध नाही. त्याविषया इतर ग्रीक इतिहासकारांनी जे लिहून ठेवले त्यावरून मेगस्थनीजविषयी एकांगी मत बनविणे योग्य नाही. कारण ज्या ग्रीक इतिहासकारांनी इंडिकातील विवरणे उदधृत केली ती जशीच्या तशी उदधृत केली का? त्यात त्यांनी स्वतःची काही भर घातली का? ती विवरण उदधृत करताना मेगॅस्थनीजने दिलेल्या संदर्भाचा त्यांनी बरोबर अर्थ लावला का?सर्व मुद्यांचा विचार होणे आवश्यक आहे. तेव्हा सगळा दोष मेगस्थनीजच्या माठा मारून त्याला खोटारडा ठरविण्यापेक्षा त्याच्या विधानांचा काळजीपूर्वक विचार करून मगच ती स्वीकारणे हेच श्रेयस्कर ठरेल.

इंडिका चार भागांत विभाजित असून त्यात भारताची भौगोलिक परिस्थिती पशु-पक्षी, निसर्ग, शासन, धर्म, समाज व त्याच्या परंपरा, कला इ. विषयांची माहिती आहे. त्यात सम्राटापासून तर आदिवासींपर्यंतचे सूक्ष्म निरीक्षण आहे. डॉ. स्मिथ इंडिकाला भारतीय इतिहासाचे अत्यंत विश्वसनीय साधन मानतात. येथे इंडिकाचा संक्षिप्त परिचय पाहू या.

**मेगस्थनीजच्या इंडिकातील भारताचे वर्णन**

**भौगोलिक परिस्थिती**

मेगस्थनीजच्या मते भारत या महाद्वीपाचा आकार चौकोनी असून त्याच्या उत्तर सीमेवर हिमोडोस (हिमालय) पर्वत स्थित असून या महाद्वीपाला पूर्व व दक्षिणेला दोन समुद्रांनी घेरले आहे. याच्या पश्चिम भागात सिंधू, गंगा, सोन, कोसोन, कोण्डोचेटीज (गंडक), सोलोमेटीज (रावी) आणि सेम्बोस (गोमती) या नद्या वाहतात. यात दक्षिण भारतातील नद्यांचा उल्लेख नाही. कारण त्याला दक्षिण भारताच्या भौगोलिक स्थितीचे ज्ञान नसल्यामुळे तो दक्षिण भारताचे भौगोलिक वर्णन टाळतो. गंगा ही भारतातील सर्वात मोठी नदी असून ती उत्तरीय पर्वतातून निघून पूर्वेकडे समुद्राला जाऊन मिळते. हिच्या पात्राची कमीत कमी रुंदी १०० स्टेडिय आहे. त्याने अफगाणिस्थानला चंद्रगुप्तच्या साम्राज्याचे अंग मानल्याने तो अफगाणिस्थानातील कोफेन (काबुल), सोस्टेज (स्वात) आणि गेरोया (गोमल) इ. नद्यांचाही उल्लेख करतो. भारतात उन्हाळा व हिवाळा हे दोनच ऋतू असून उन्हाळयात जास्त गर्मी असत दोन्ही ऋतूत पाऊस पडत असला तरी उन्हाळयात जास्त पाऊस पडतो असे भारताच्या हवामानाविषयी तो लिहितो.

**सामाजिक परिस्थिती** –

१) **समृद्ध जीवन-** भारतीय जनजीवन अत्यंत सुखी व समृद्ध असून सुपीक जमीन, खनिज संपत्ती, पशुधन यांची रेलचेल असल्याचे मेगस्थनीज लिहितो.

२) **उच्च नैतिक आदर्श आणि साधेपणा -** तत्कालीन भारतीयांच्या जीवनात नैतिकतेला सर्वोच्च स्थान होते. भारतीय हे चारित्र्यवान, बुद्धिवान, पराक्रमी आणि साधी राहणी असलेले होते. ते मितभाषी आणि सत्यवचनी असून समाजाचे सर्व व्यवहार परस्परांच्या विश्वासावर चालत. चोरी व इतर गुन्ह्यांचे प्रमाण अतिशय अल्प होते.

३) **अन्न आणि वेशभूषा-** लोकांचा आहार साधा आणि सात्त्विक होता. गहू व तांदूळ हे त्यांचे मुख्य अन्न असून ते भूक लागली तेव्हा खात. त्यांच्या जेवणाच्या वेळा निश्चित नव्हत्या. त्यांच्यात सामूहिक भोजनाची प्रथा नव्हती. सात्त्विक आणि संयत आहारामुळे भारतीयांचे आरोग्य चांगले राही. यज्ञादि धार्मिक व सामाजिक प्रसंगाशिवाय भारतीय मद्यपान करीत नसत.लोकांना उत्तम वस्त्रे आणि अलंकार धारण करण्याची हौस होती. वस्त्रांवर सोन्याच्या जरीने कशिदा काढला जाई. श्रीमंत लोक अत्यंत तलम अशी मलमलची वस्त्रे वापरत.

४) **सामाजिक परंपरा-** भारतीयांत मृत व्यक्तींच्या स्मरणार्थ स्मारके बांधण्याची परंपरा नव्हती. समाजात एक पत्नित्वाची प्रथा होती परंतु श्रीमंत व राजघराण्यातील पुरुष एकापेक्षा जास्त स्त्रियांशी विवाह करीत. पुत्रप्राप्ती स्त्रीजन्माचे सार्थक समजले जाई. समाजात वृद्ध व ज्ञानी यांचा आदर केला जाई.

**५) समाज -** जातिप्रथा भारतीय समाजाचा आधार होती. जातीची बंधने अत्यंत कडक असून त्यात परिवर्तन शक्य नसे. आंतरजातीय विवाह शक्य नव्हते. स्वजातीचाच व्यवसाय करता येत असे. मेगॅस्थनीज भारतीय समाजात तत्त्वज्ञ, शासक, मंत्री, सैनिक, व्यापारी, शेतकरी आणि शिकारी हे सात वर्ग असल्याचा उल्लेख करतो.मेगॅस्थनीज ब्राह्मण आणि श्रमण (साधू) यांचा उल्लेख करताना म्हणतो की, हे दोघेही भोगविलासापासून दूर राहून अत्यंत साधे जीवन जगतात. ते मद्य व मांस यांना स्पर्शही करीत नाहीत. शहरापासून दूर राहून सतत फिरतीवर राहतात व धर्मोपदेश करतात. यांचा जास्तीत जास्त वेळ मनन व चिंतनात जातो.

**आर्थिक जीवन** –

शेतकरी अत्यंत सुखी होता. राज्यात सहसा दुष्काळ पडत नाही. दुष्काळ पडल्यास राज्याकडून जनतेला सर्व प्रकारची मदत दिली जाते. शेती हा मुख्य व्यवसाय असून साधारणतः वर्षातून दोन पिके घेतली जातात. युद्धप्रसंगीही शेतीला कोणतेही नुकसान पोहोचविले जात नसे.

**धार्मिक जीवन** –

मेगस्थनीज साधू-सन्याशांचा उल्लेख करतो. ब्राह्मणांच्या निःस्पृह व निर्भीड वृत्तीचे वर्णन करताना मेगस्थनीज तक्षशिलेच्या मंदमिस साधूचा उल्लेख करतो . अलेक्झांडर या साधूला भेटायला गेला असताना या साधूने अलेक्झांडरला भेट नाकारली. भारतीय अत्यंत धार्मिक असून त्यांच्या निरनिराळया परंपरा व श्रद्धा असून त्यांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. भारतीय डॉयनीसियस आणि हेराक्लिज या ग्रीक देवतांची पूजा करतात असे मेगस्थनीज लिहितो परंतु येथे त्याचा घोटाळा झाला कारण तो शिवाला डॉयनीसियस आणि कृष्णाला हेराक्लिज समजला. गंगा व सिंधु नद्या पवित्र मानल्या जातात.

**राजकीय परिस्थिती -**

**१) राजा व त्याचा दरवार**

मेगॅस्थिनीजने चंद्रगुप्त व त्याच्या दरबाराचे - विस्तृत वर्णन केले आहे. चंद्रगुप्ताविषयी तो लिहितो, चंद्रगुप्त अत्यंत तेजस्वी असून त्याचा सर्वत्र दरारा आहे. तो दिवसभर निरनिराळ्या कामात व्यस्त राहतो. दररोज रात्री झोपताना तो स्वत से शयनगृह बदलतो. कदाचित त्याला नंदसमर्थकांकडून धोका असावा सम्राटाला शिकारीचा अत्यंत नाद असून तो हत्तीच्या अंबारीतून शिकारीला जात असे. शिकारीला जाताना त्याचा लवाजमा बघण्यासारखा असे. रस्त्याच्या दुतका दोर लावले जात सम्राटाची स्वारी जात असताना हे दोर ओलांडून रस्त्यावर येण्याची कोणी नसे. राजाच्या रक्षणासाठी हातात द्वा तलवारी घेतलेल्या तारख दुतर्फा चालत.शिकार सोडून इतर वेळी राजा मौल्यवान वस्त्रे व अलंकार धारण करून रत्नजडित पालखीत बसून जात असे राजाचा जन्मदिवस अत्यंत धूमधडाक्याने साजरा केला जाई. राजाला कुस्ती, प्राण्यांची झुंज व शिकार यांची अत्यंत आवड होती राजाच्या दरबाराची शान काही और होती. दरबारात सोन्याचांदीची आकर्षक भांडी, कलाकुसर केलेल्या खुर्च्या व मेज पाहणाऱ्यांचे डोळे दिपवून टाकीत राजा रत्नजडीत सुवर्णाच्या सिंहासनावर बसत असे त्याच्या भोवती अंगरक्षक, छत्रचामरे ढाळणारे व सुवर्णकलश हाती घेतलेले सेवक व सेविका उभ्या राहत राजाचा केस धुण्याचा विधीही अत्यंत आकर्षक राहत असे.

**२) राजमहाल**

राजाचे निवासस्थान राजधानी पाटलीपुत्रच्या मध्यभागी होते. सौंदर्य, वैभव आणि सुखसोयी यांच्या दृष्टीने चंद्रगुप्ताचा राजमहाल ग्रीक व इराणी राजांच्या महालांपेक्षा सरस होता. महालाच्या सभोवती सुंदर बगीचे व सरोवर असून बगिच्यात निरनिराळ्या फळफुलांची झाडे आहेत, ज्यात तऱ्हेतऱ्हेचे पक्षी मुक्त संचार करतात. बगिच्यात काही प्राणी व सरोवरात मासे पाळण्यात आले असून राजमहालात अनेक दालने आहेत. राजमहाल पाहताना प्रत्यक्ष स्वर्ग पृथ्वीवर उतरल्याचा भास होतो.

**३) राजकीय अधिकारी**

मेगस्थनीज चंद्रगुप्ताच्या निरनिराळया राजकीय अधिकाऱ्यांचा उल्लेख करतो. काही अधिकांरयाकडे बाजाराची तर काहींकडे नगराची देखरेख होती. काही अधिकारी नदी, कालवे इ. जलमार्गांची व्यवस्था पाहत तर काही कडे करवसुलीची कामे होती. मेगस्थनीज पाटलीपुत्रापासून वायव्य भारताकडे जाणाऱ्या राजमार्गांचा उल्लेख करतो.

**४) न्यायव्यवस्था –**

भारतात गुन्ह्यांचे प्रमाण कमी असून लहानसहान अपराधांसाठीही अंगभंगाची शिक्षा दिली जाई.

**५) लष्कर**

३० सदस्यांच्या समितीकडे लष्कराचा कारभार सोपविण्यात .आला होता. या समितीचे प्रत्येकी ५ सदस्यांचा एक असे ६ विभाग होते. पायदळ, घोडदळ, रथदळ, हत्तीदळ, नाविक दळ आणि रसद पुरवठा असे हे सहा विभाग असून सैनिक धनुष्यबाण, ढाल, तलवार, बर्धी या हत्यारांनी लढत.